दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ३१ ✻ जालना ✻ ✻ मंगळवार ०१ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## 'फडणवीसांनी आगी लावण्याचे काम केले, त्यांना फक्त...', जरांगेंचा उल्लेख करत राऊतांचा संताप;

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी परभणी दौरा करू नये असं आव्हान देणाऱ्या मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या इशाऱ्यानंतरही शिंदेंचा दौरा रविवारी पूर्ण झाला. यावरुनच आता खासदार संजय राऊत यांनी निशाणा साधताना मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे.

मनोज जरांगे हे प्राण पणाला लावून आंदोलन करतायत. अशावेळी मराठवाड्यात वातावरण तप्त असताना परभणीतील मेळावा टाळावा अशी भूमिका जरांगे पाटील यांची होती. संजय जाधव यांना निवडून आणण्यासाठी जरांगे पाटलांची मदत झाली होती. जे कुणी बंडू झंडू जाधव आहेत ते ठाकरेंचे झाले नाहीत, ते जरांगेंचे कसे होणार. ते नेहमी नवीन आईबाप शोधत असतात, असा टोला संजय राऊतांनी लगावला. ठाकरेंशी गद्दारी केली हीच त्यांची मोठी चूक. त्याच्याकडून जरांगे पाटील यांनी काय अपेक्षा करावी. जरांगे त्याला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. ते परत संसदेत जाणार नाहीत याची काळजी शिवसैनिक घेतील, असा इशाराही राऊतांनी दिलाय. आगी लावण्याचे काम फडणवीस यांनी केले





मुख्यमंत्री कुंपणावर बसून आहेत आरक्षण विषयावर. त्यांनी कधीही मार्ग काढलेला नाही. ज्युनियर मंत्री, मुंबईतील आमदार पाठवतात चर्चेला. प्रश्नांकडे गांभिर्याने पाहत नाही. मुख्यमंत्री यांनी वेळ काढावाच लागेल. एकाही समाजाला न्याय ते देवू शकले नाहीत. फक्त समाजात वाद निर्माण करतात, असा आरोप संजय राऊतांनी केला आहे. भाजपने जातीय राजकारण करणे बंद करायला पाहिजे. आगी लावण्याचे काम फडणवीस यांनी केले आहे. त्यांना फक्त श्रेय घ्यायचे आहे. विविध पक्षातील प्रमुख पाच जाणत्या नेत्यांसोबत ते चर्चा करत नाहीत. ही सुबुद्धी येत नाही तोवर आम्ही त्यांना नेता मानायला तयारी नाही, असंही राऊत यांनी म्हटलं आहे. सरकारने चर्चेची तयारी ठेवावी मागील वेळी मुंबईत त्यांची फसवणूक झाली. सरकारने चर्चेची तयारी ठेवावी. त्यांना कसे गुंडाळता येईल याच्या बैठका सुरू (पान ३ वर)

## ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्यांसाठी सुरु असलेल्या आमरण उपोषणाला खा. डॉ. कल्याण काळे यांची भेट




जालना/प्रतिनिधी : ब्राह्मण समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जालना शहरातील गांधी चमन येथे श्री. दीपक रणनवरे हे आमरण उपोषणास बसले आहेत. आज सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन श्री. दीपक रणनवरे यांची आस्थेने विचारपूस केली. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ब्राह्मण समाजाच्या मागण्या सविस्तरपणे समजून घेतल्या. समाजातील मुला–मुलींना संपूर्ण शिक्षण मोफत मिळावे, तसेच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी केंद्र सुरू करून आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यासह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असल्याचे श्री. रणनवरे यांनी खासदारांना सांगितले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. तसेच संबंधित मागण्यांबाबत शासनस्तरावर योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका व्यक्त केली. समाजाच्या रास्त मागण्यांकडे शासनाने सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून त्यावर तातडीने निर्णय घ्यावा आणि उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर योग्य तो तोडगा काढावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, संजय इंगळे, संजय मुथा, सुनील चौधरी, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, राजाभाऊ (पान ३ वर)

## जालना शहरातील दलित तरुणावर झालेल्या अमानुष मारहाणी प्रकरणी कठोर कारवाईची खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी



जालना । प्रतिनिधी : जालना शहरातील कन्हय्यानगर परिसरात परमेश्वर सुहास हिवाळे या दलित तरुणावर झालेल्या अमानुष मारहाणीच्या घटनेचा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तीव्र निषेध व्यक्त केला असून, या प्रकरणातील सर्व दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जिल्हा पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

२३ मे २०२६ रोजी घडलेल्या या घटनेत संबंधित तरुणाला त्याच्या अल्पवयीन मुलासमोर सार्वजनिक ठिकाणी बेदम मारहाण करून त्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यांत आला. या प्रकारामुळे पीडिताच्या मानवी प्रतिष्ठेला धक्का पोहोचला असून संपूर्ण समाजात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींवर कठोर गुन्हे दाखल करण्यात यावेत. पीडित युवक व त्याच्या कुटुंबाला आवश्यक ती सुरक्षा, न्याय आणि मानसिक आधार उपलब्ध करून देण्याचीही त्यांनी मागणी केली आहे. यासोबतच, समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आणि कायदा–सुव्यवस्था बिघडविणाऱ्या प्रवृत्तींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडत असून प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि ठोसपणे कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हा पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व वेगवान चौकशी करून दोषींना तातडीने अटक करावी तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी केली आहे.

यावेळी राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, ज्ञानेश्वर भांदरगे, संजय इंगळे, संजय मुथा, सुनील चौधरी, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे,राजाभाऊ कुलकर्णी, रऊफ परसूवाले, कृष्णा पा.पडूळ,राम पा.सिरसाठ, ज्ञानेश्वर डुकरे, नारायण वाढेकर, वासिम शेख, सोपान तिरुखे, गणेश खरात, ज्ञानदेव इंगोले अर्जुन भांदरगे, योगीताताई धांडगे, रघुवीर गुढे, मुफस्सार कुरेशी, सुरज यलगंटवार, शेख शकील, अकिल सय्यद, अब्दुल रफिक, दिनेश सुराणा, चंद्रकांत रत्नपारखी, भाऊसाहेब लकडे, राम गव्हाणे,नूर महेमूद,कलीम भाई, वसीम खान, शेख खलील, भागवत घाटे, विक्रम चव्हाण, गणेश एखंडे, दिग्विजय धांडगे,शेख रियाझ, मोबीन खान यासह नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

## पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांचा सहभाग; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, आरोग्य तपासणी व विविध उपक्रमांचे आयोजन

## जालन्यात 'भटके विमुक्त दिवस' उत्साहात साजरा

जालना : इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट हा 'भटके विमुक्त दिवस' म्हणून जालना येथे विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अनिता राठोड, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, प्रा. अंकुश चव्हाण, विकास राठोड, विष्णुगिरी, अशासकीय सदस्य मुकेश भारद्वाज, मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांची उपस्थिती होती.

यावेळी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृह येथे आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्याने व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच भटके विमुक्त जाती–जमातींच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भटके विमुक्त समाजाची संस्कृती, जीवनमूल्ये व परंपरा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रम राबविण्यात आले. आरोग्य तपासणी, आधारकार्ड नोंदणी, जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यासाठी शिबिरे आयोजित करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले. मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक अनंत कदम यांनी यावेळी 'भटके विमुक्त दिवस'चे महत्त्व विशद करून विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश बहिर यांनी केले. श्रीमती स्नेहल सोनावळे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या बोलीभाषेत मनोगत व्यक्त केले. प्रा. अंकुश चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर मुख्य वक्ते प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांनी (पान ३ वर)

## अण्णा हजारेंची प्रकृती खालावली



मुंबई : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना प्रकृती खालावल्यामुळे मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. इन्फेक्शन आणि अशक्तपणामुळे अण्णांची तब्येती बिघडली आहे. सध्या हॉस्पिटलची अनुभवी मेडिकल टीम अण्णा हजारेंवर उपचार करत आहे. मागील पाच दिवसांपासून अण्णा हजारेंवर शिरुरच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. या उपचारांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे अण्णांना मुंबईच्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.

## अशोकराव कदम यांचा सेवापूर्ती गौरव व साठावा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

### भारतीय रेल्वेतील प्रदीर्घ सेवेनंतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार; शाल-पुष्पहार देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा

जालना/प्रतिनिधी : भारतीय रेल्वेत ट्रॉलीमन इंजिनिअर म्हणून प्रदीर्घ सेवा बजावणारे अशोकराव गोविंदराव कदम यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यासह साठाव्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनी त्यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार केला.

अशोकराव कदम यांनी भारतीय रेल्वेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडली. सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि सहकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध जपत त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या सेवापूर्तीबरोबरच साठावा वाढदिवस आल्याने हा दुहेरी आनंदाचा सोहळा कुटुंबीय, मित्रपरिवार व हितचिंतकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी



अशोकराव कदम यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभावे तसेच सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य सुख–समाधान आणि आनंदात जावे, अशा शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात, शेख जमीर भाई, स्वप्निल पहाडे, दीपक हिवाळे, राहुल नाटकर, रवी इंगळे, प्रदीप साळवे, गुलाब दवंडे, ड. महेंद्रकुमार वेडेकर, बौद्धाचार्य हेमंत पहाडे, आयान कायमखानी, विकास वेडेकर, नितीन साळवे, नितीन खरात यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच आर. सी.सी. मित्र मंडळ, बुद्धभूषण मित्र मंडळ यांचे पदाधिकारी व सदस्य तसेच पंचशील नगर, बालाजी नगर, हॉलनी दालमिल परिसर, संत कबीर नगर, नागसेन नगर आणि हमालवाडी (पान ३ वर)




## सीएनजी आणि पीएनजी महागला

मुंबई : महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ मंगळवार १ सप्टेंबरपासून लागू होणार असल्याची माहिती कंपनीने दिली. घरगुती पाईपद्वारे पुरवल्या जाणाऱ्या नैसर्गिक वायूच्या (पीएनजी) दरातही प्रति स्टँडर्ड क्यूबिक मीटर (एससीएम) एक रुपयाची वाढ केल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. यामुळे सध्या ८६ रुपये किलो दराने उपलब्ध असलेला सीएनजी मंगळवार १ सप्टेंबरपासून ८८ रुपये किलो दराने उपलब्ध होणार आहे. तसेच ५२ रुपये दराने उपलब्ध असलेला पीएनजी मंगळवार १ सप्टेंबरपासून ५३ रुपये स्टँडर्ड क्यूबिक मीटर (एससीएम) दराने उपलब्ध होणार आहे. अमेरिका – इराण युद्ध आणि रशिया – युक्रेन युद्ध यामुळे कच्च्या मालाच्या खर्चात झालेल्या तीव्र वाढीमुळे ही दरवाढ झाल्याचे महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) जाहीर केले आहे. सीएनजीच्या वाढत्या मागणीमुळे गरजेचा मोठा भाग आयात केलेल्या स्पॉट रिगॅसिफाइड लिक्विफाइड नॅचरल गॅस मधून भागवावा लागत आहे, जो अधिक महाग झाला आहे. गॅस मिळवण्याच्या वाढलेल्या खर्चामुळे एकूण उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे. यामुळेच सीएनजी आणि पीएनजीच्या दरात वाढ केली आहे, असे महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) सांगितले. दरवाढीचा परिणाम सामान्य वाहतुकीवर तसेच मालवाहतुकीवरही होण्याची शक्यता आहे. वाहतूक खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

## एबीसीडी' आरक्षण निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करा ; जालन्यात मातंग समाजाचा विराट मोर्चा

जालना । प्रतिनिधी : अनुसूचित जातींमधील आरक्षणाच्या वर्गीकरणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची महाराष्ट्र सरकारने तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच मातंग समाजासह संबंधित ५९ जातींना आरक्षणाचा योग्य लाभ मिळावा, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने सोमवारी जालना शहरात विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात महिला, पुरुष आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. जालना शहरातील मस्तगड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात झाली. गांधी चमन,




शनी मंदिर, नूतन वसाहत मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चादरम्यान आंदोलकांनी आरक्षणाच्या वर्गीकरणाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींमधील वंचित घटकांना आरक्षणाचा प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि समाजातील शेवटचा घटकही मुख्य प्रवाहात यावा, या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मात्र महाराष्ट्रात या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विलंब होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलक सर्जेराव जाधव यांनी राज्य सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. (पान ३ वर)

# संपादकीय

## भौगोलिक रचना

ऐतिहासिकदृष्ट्या, चीनकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य हल्ल्याचा किंवा घुसखोरीचा धोका हा याच पश्चिम किनारपट्टीला राहिला आहे. साहजिकच, तैवानने आपली बहुतांश लष्करी सज्जता, क्षेपणास्त्र यंत्रणा आणि संरक्षण तटबंदी याच भागात केंद्रित केली आहे. याउलट तैवानची पूर्व किनारपट्टी थेट प्रशांत महासागराकडे उघडते. भौगोलिकदृष्ट्या हा भाग उंच कडे-कपाऱ्यांनी आणि डोंगराळ भूभागाने वेढलेला आहे. त्यामुळे चिनी नौदलाला थेट पूर्व किनाऱ्यावरून तैवानमध्ये प्रवेश करणे नेहमीच कठीण जाणार आहे. आजवर तैवानी लष्करासाठी हा पूर्व किनारा एका सुरक्षित पनाहगाहासारखा राहिला आहे. युद्धजन्य परिस्थितीत तैवानचे नौदलाचे तळ, लढाऊ विमाने आणि लष्करी रसद सुरक्षित ठेवण्यासाठी याच पूर्व किनारपट्टीचा वापर केला जातो; परंतु चीनने आता नेमक्या याच 'सुरक्षित क्षेत्रा'कडे आपली नजर वळवली आहे. पूर्व किनारपट्टीवर 'कोस्ट गार्ड'ची गस्त वाढवून चीनने तैवानला एक स्पष्ट संदेश दिला आहे, की आता त्याच्यासाठी कोणताही कोपरा सुरक्षित राहिलेला नाही. चीन तैवानला केवळ पश्चिमेकडूनच नव्हे, तर पूर्वेकडूनही वेढून पूर्ण नाकेबंदी करण्याचा सराव करत आहे. भविष्यात चीनने तैवानवर थेट लष्करी कारवाई केली, तर पूर्व किनारपट्टीवरूनच अमेरिका, जपान किंवा अन्य पाश्चात्त्य मित्रदेशांकडून तैवानला मदत मिळण्याची सर्वाधिक शक्यता आहे. त्यामुळे या पूर्व किनाऱ्यावर आत्तापासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित करून, संकटसमयी आंतरराष्ट्रीय मदतीचा मार्ग पूर्णपणे रोखून धरण्याची चीनची ही दीर्घकालीन योजना आहे. चीनने नौदलाच्या विनाशकारी युद्धनौका पाठवण्याऐवजी पांढऱ्या रंगाची, नागरी प्रशासनाशी साधर्म्य सांगणारी 'कोस्ट गार्ड'ची (उेरींं र्ब्रीरीव)जहाजे का पाठवली, याचे उत्तर 'ग्रे-झोन वॉरफेयर' या संकल्पनेत दडले आहे. लष्करी मुत्सद्देगिरीमध्ये ही अशी स्थिती असते, जी पूर्णपणे शांतताही नसते आणि उघड युद्धही नसते. पांढरा रंग म्हणजे शांतता आणि काळा रंग म्हणजे उघड युद्ध असे मानल्यास, या दोन्हीच्या मधला जो धुसर भाग असतो, त्याला 'ग्रे-झोन' म्हटले जाते. थोडक्यात सांगायचे, तर शत्रूवर एकही गोळी न झाडता, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे थेट उल्लंघन न करता, समोरच्या देशाला मानसिक आणि रणनीतिकदृष्ट्या इतके थकवून सोडायचे की त्याने शेवटी स्वतःहून गुडघे टेकावेत. हीच ही रणनीती आहे. कोस्ट गार्ड हे अधिकृतपणे लष्कर किंवा नौदलाचा भाग मानले जात नाही, तर सागरी हद्दीतील तस्करी रोखणारे आणि कायद्याचे पालन करून घेणारे नागरी किंवा निमलष्करी बल असते. चीन आपल्या 'कोस्ट गार्ड'ला तैवानच्या हद्दीत पाठवतो, तेव्हा जगाला दाखवतो, की आम्ही कोणतेही युद्ध करत नसून आमच्याच एका प्रांतात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गस्त घालत आहोत. चीनची ही चलाखी आंतरराष्ट्रीय समुदाय आणि विशेषतः अमेरिकेला कोंडीत पकडणारी ठरते. संयुक्त राष्ट्रांच्या नियमांनुसार, कोणताही देश आपल्या संरक्षणासाठी किंवा मित्रदेशाच्या मदतीसाठी थेट लष्करी हस्तक्षेप तेव्हाच करू शकतो, जेव्हा त्याच्यावर 'सशस्त्र लष्करी हल्ला' झाला असेल. आता चीनने युद्धनौका न पाठवता केवळ 'कोस्ट गार्ड' पाठवले असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा लष्करी हल्ला ठरत नाही. परिणामी, अमेरिकेसारख्या महाशक्तीलाही तैवानच्या मदतीसाठी थेट आपली नौदल जहाजे पाठवणे कायदेशीर आणि कूटनीतिकदृष्ट्या अवघड होऊन बसते. चीन नेमक्या याच कायदेशीर पळवाटेचा गैरफायदा घेत आहे. या 'ग्रे-झोन' रणनीती अंतर्गत चीन एकाच वेळी अनेक पातळ्यांवर तैवानवर दबाव आणत आहे. ज्याप्रमाणे सॅलडच्या रूपात बारीक बारीक तुकडे केले जातात, त्याचप्रमाणे चीन तैवानच्या सागरी हद्दीचे आणि संप्रभुतेचे हळूहळू लहान लहान तुकड्यांमध्ये हरण करत आहे. चीन एकदम मोठा हल्ला करत नाही, कारण त्याला माहीत आहे, की मोठ्या हल्ल्याला तीव्र जागतिक विरोध होईल. त्याऐवजी तो दर महिन्याला आपली जहाजे काही किलोमीटर आत पाठवतो, तिथे काही काळ मुक्काम ठोकतो आणि नवीन सीमा रेषा तयार करतो. काही काळाने घुसखोरी करून ताब्यात घेतलेली तीच जागा अधिकृत मानली जाऊ लागते. या पद्धतीमुळे तैवानला दरवेळी नेमकी काय प्रतिक्रिया द्यावी, हे समजत नाही. चीन तैवानविरुद्ध केवळ 'कोस्ट गार्ड'च नव्हे, तर प्रशिक्षित निमलष्करी जवान असलेल्या व्यावसायिक मासेमारी नौकांचाही वापर करतो. या नौका तैवानच्या बेटांभोवती वेढा घालून दबाव निर्माण करतात. तैवानने कारवाई केल्यास चीन त्याला निष्पाप मच्छीमारांवरील अन्याय म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडतो. थेट लष्करी हल्ल्याऐवजी जहाजांना धडक देणे, पाण्याच्या प्रबळ फवाऱ्यांचा वापर करणे आणि शक्तिशाली लेझरद्वारे दळणवळणात अडथळे निर्माण करणे अशा 'ग्रे-झोन वॉरफेयर'च्या तंत्रांचा चीन अवलंब करतो. यामुळे तैवानचे नुकसान होते, पण मोठी आंतरराष्ट्रीय लष्करी प्रतिक्रिया टाळली जाते. या वाढत्या दबावाला उत्तर म्हणून तैवानने कठोर भूमिका घेतली आहे. चिनी 'कोस्ट गार्ड'कडून तपासणीची मागणी झाल्यास ती नाकारण्याचे आदेश देण्यात आले असून, बळजबरी झाल्यास नौदलाला आवश्यक कारवाईचे निर्देश आहेत. मात्र सततच्या चिनी गस्तीमुळे तैवानच्या सैन्यावर २४ तास सतर्क राहण्याचा ताण असून, मानसिक थकवा आणि आर्थिक भार वाढत आहे. आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील भू-राजकीय नकाशावर तैवानची स्थिती नेहमीच एका धुमसत्या ज्वालामुखीसारखी राहिली आहे. चीनने तैवानला आपल्या मुख्य भूमीचा भाग मानणे आणि तैवानने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडणे, हा संघर्ष नवा नाही; मात्र अलीकडच्या काळात या संघर्षाचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. पारंपरिक युद्धाच्या तोफा डागण्याऐवजी किंवा क्षेपणास्त्रांची थेट धमकी देण्याऐवजी चीनने आता एका अत्यंत छुप्या, चाणाक्ष आणि दीर्घकालीन रणनीतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. या रणनीतीचे ताजे आणि अत्यंत चिंताजनक उदाहरण म्हणजे चीनने तैवानच्या पूर्व किनारपट्टीवर अचानक वाढवलेली सागरी सुरक्षा दलाची गस्त. एकाच महिन्यात दुसऱ्यांदा चीनच्या कोस्ट गार्डने तैवानच्या अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या पूर्व किनारपट्टीवर कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या नावाखाली शक्तिप्रदर्शन केले. वरकरणी ही केवळ नियमित सागरी गस्त वाटू शकते; परंतु जागतिक संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हा चीनच्या 'ग्रे-झोन वॉरफेयर'चा (धुसर क्षेत्रातील युद्धनीती) एक अत्यंत धोकादायक टप्पा आहे. यात सर्वात मोठा प्रश्न हा निर्माण होतो, की जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शक्तिशाली नौदल पाठीशी असताना चीनने तैवानला घेरण्यासाठी आपल्या 'कोस्ट गार्ड'ला समोर का केले आहे? यामागे ड्रॅगनची नेमकी कोणती नवी चाल आहे आणि यामुळे आशियातील सुरक्षेचे समीकरण कसे बदलणार आहे, याचा सखोल वेध घेणे गरजेचे आहे. चीन आणि तैवानमधील संघर्षाचा अभ्यास करताना भौगोलिक रचनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. तैवानच्या पश्चिमेला 'तैवान स्ट्रेट' आहे,

# जान है तो जहान है!



चहा बरोबर बाजूला भरपूर ओले खोबरे आणि कोथिंबीर घातलेले पोहे खायला घेतले आणि समोरचा रिमोट दाबून बातम्या लावल्या. पहिलीच बातमी म्हणजे १० ऑगस्ट २०२६ रोजी गडचिरोली जिल्ह्यात धानोरी तालुक्यातील जपतलाई येथील शासकीय अनुदानित आश्रमशाळेत राहणाऱ्या काही मुलींचा साप चावून मृत्यू झाला आहे, तर संपूर्ण वृत्तानुसार आश्रमशाळेतील काही मुली पलंगावर झोपल्या होत्या; परंतु सगळ्यांसाठी तिथे पलंग उपलब्ध नव्हते त्यामुळे त्यांना खाली झोपवण्यात आले होते. रात्री २ वाजता एका विषारी सापाने जवळजवळ सहा विद्यार्थिनींना दंश केला. त्यापैकी तिघींचा तर ताबडतोब मृत्यू झाला. आणखी तिघी रुग्णालयापर्यंत पोहोचल्या. ही हृदयद्रावक घटना ऐकून पोह्याची बशी बाजूला सरकवली आणि डोळ्यांतले पाणी पुसत चहाचा कप उचलून बेसीनमध्ये ठेवला. त्या आठवड्यात, नंतर केव्हा तरी बातम्या पाहताना आणखी काही माहिती मिळू शकली... ज्या अहवालावरची सही पाहून शाळेची तपासणी योग्य झाली आहे, असे समजून शिक्कामोर्तब केले गेले, त्या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले. त्या शाळेचे मुख्याध्यापक आणि वसतिगृह अधीक्षक यांनाही पोलिसांनी अटक केली. यानंतर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने या घटनेची दखल घेत महाराष्ट्र सरकारला दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याची नोटीस बजावली.इतक्यावर शासन यावेळेस थांबलेले नाही, तर महाराष्ट्र सरकारने १८ ऑगस्ट २०२६ रोजी या घटनेच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यानुसार 'सर्पदंश' हा 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्यात आला आहे. आता अधिसूचित आजार म्हणजे काय हे पण मी बारकाईने जाणून घेतले. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय व किंवा खासगी रुग्णालयात सर्पदंश झालेला रुग्ण भरती झाल्यास त्याच्या मृत्यूची जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना ताबडतोब माहिती देणे बंधनकारक झाले आहे. एकंदरीत काय तर कोणीतरी जीव गमावल्यावर एक महत्त्वाचा आणि लोकोपयोगी कायदा झालाय, हेही नसे थोडके! एकीकडे ही घटना घडली आणि श्रावणाची चाहूल लागली. 'नागपंचमी' सण साजरा करण्याच्या आनंदाच्या उत्साहाच्या क्षणी, भाषण करण्यासाठी काही मुद्दे मी काढत असताना अचानक वाचायला मिळाले की दगडाचा उंदीर, साप आपण पुजतो. पण तो खरा असला तर त्याला मारून टाकतो निर्जीवांच्या बाबतीत आपले प्रेम आणि श्रद्धा शिगेला पोहोचते आणि सजीवांचा आपण द्वेष करतो. खरेच आहे हे पण म्हणून खऱ्या सापांना मारायचेच नाही का? उंदरांना असेच घरभर वावरू द्यायचे का? हा कोणत्याही सामान्य माणसासारखा पडणारा प्रश्न मलाही पडला. त्यात गणपतीला महिनाही उरलेला नाही. कोणतीही गणपतीची मूर्ती उंदीर मामाशिवाय कधीच दिसत नाही. अशा वेळेस निसर्गाचे जे जैविक चक्र आहे ते अखंड फिरते राहण्यासाठी काही गोष्टी आपल्याला करणे आवश्यक आहे जसे की, या प्राण्यांच्या वाटेला आपण जर गेलो नाही, तर ते आपल्या वाटेला जात नाहीत, म्हणून त्यांना मारायचे नाही, हे तत्त्वज्ञान ऐकत आपण पर्यावरण आणि प्राणीप्रेम जागवत आलेलो असलो तरी जेव्हा निवांत झोपलेल्या निष्पाप बालकांचा सापाने चावा घेतला, या निवळ बातमीनेच आपण हादरून गेलो. ज्या पालकांची ही मुले असतील त्यांच्या जीवाचे काय हाल झाले असतील? यापुढे या आणि इतर आश्रमशाळेत किती विद्यार्थी टिकून राहतील याबद्दल शंकाच वाटते. शेवटी काय तर - जान है तो जहान है! यापुढे ग्रामीण भागातील अँटी-स्नेक व्हेनम (-ड्त) लसींच्या साठ्याचे ताबडतोबीने नियोजन केले जाईलही, पण...? आपण आपल्या पातळीवर काय करू शकतो, याचा थोडा विचार करूया. चिमुकल्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी काही पलंग / खाटा विकत घेऊन देता येतील का?, याचा विचार करूया. कारण पावसाळ्याच्या दिवसांत बिळात पाणी भरल्यावर साप आणि किडेकीटकांना आपले घर सोडून बाहेर पडण्याची वेळ येतेच ना म्हणून त्यांच्यामुळे कोणी बेघर होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे!

# थाळ्या तुला बांधून

एके दिवशी मी समुद्रावर फिरायला गेलो होतो. संध्याकाळचे सहा वाजले होते. सूर्य अस्ताला जाण्याच्या तयारीत होता. चौपाटीवर बऱ्यापैकी गर्दी होती. तरुण मंडळी पाण्यात खेळत होती. मुलं वाळूत किल्ले बनवत होती. वयस्कर लोक वाळूत बसून समुद्राच्या अथांग रूपाकडे बघत गप्पा मारत बसले होते. मीदेखील एक मोकळी जागा बघून वाळूत बसकन मारली आणि समुद्राच्या लाटांचा खेळ बघत बसलो. हळूहळू सूर्य समुद्रात बुडू लागला. सारी पश्चिम दिशा लाल रंगाने न्हाऊन निघाली. निसर्गाचं एक सुंदर नयनरम्य रूप सारेच लोक मोठ्या कुतूहलाने बघत होते. बराच वेळ मी मनातल्या मनात माझ्याशी बोलत होतो. दुरून कोणालाही वाटावं की मी ध्यानाला बसलो आहे. तेवढ्यात माझ्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला. मी मागे वळून पाहिलं. तर एक लहान मुलगी अगदी रडवलेल्या सुरात मला म्हणाली, काका मला खूप भूक लागली आहे हो, काहीतरी खायला द्याल का? मी कालपासून काहीच खाल्लेलं नाही. मला तिची दया आली. माझ्या मनात विचार आला, कोण असतील हिचे आई-बाबा! या मुलीला एकटे सोडून कुठे गेले असतील. काही काळजी आहे की नाही त्यांना! असे नाना विचार मनात येत होते. पण पुन्हा काका अशी निरागस हाक कानी पडताच मी भानावर आलो आणि तिथून उठलो. मुलीचा हात धरून तिला एका चांगल्या हॉटेलमध्ये नेलं. तिच्यासाठी जेवण मागवलं, तर समोरची भरलेली थाळी ती बघतच बसली. मी म्हटलं, बाळ कर सुरुवात. मग ती दोन दिवस उपाशी असलेली मुलगी पटापट खाऊ लागली. आपण एका भुकेलेल्या मुलीला जेवण देऊ शकलो याचं समाधान मला मिळत होतं. पण दोन-तीन घासातच तिच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. मी म्हणालो, बाळ काय झालं? जेवण नाही आवडलं का तुला? तू अशी रडतेस तरी का! मी म्हणालो. तशी ती खाता खाता म्हणाली, काका अजून एक थाळी मला बांधून द्याल का? माझी आई आजारी आहे. दोन दिवसांपासून तिनेसुद्धा काहीच खाल्ले नाही. आता मात्र मला आश्चर्यच वाटलं. एवढ्या लहान वयात ती मुलगी आपल्या आजारी आईची किती काळजी करते आहे. मी म्हणालो, पोरी तू सावकाश जेव. मी एक नाही जेवणाच्या अजून दोन थाळ्या तुला बांधून देतो.

# भेदभाव



या समोर पुस्तक ठेवून बसली होती. पण तिचं लक्ष पुस्तकात अजिबात नव्हतं. दूरवरून कुणालाही वाटेल की रिया वाचन करते आहे. पण तसं मुळीच नव्हतं. कारण आज सकाळीच रियाचं आणि तिच्या आईचं जोरदार भांडण झालं होतं. तसं भांडणाचं कारण हे साधच होतं. 'घरातली कामं पूर्ण कर आणि मगच अभ्यासाला बस.' आईने असं सांगताच रिया संतापली. 'मीच का सगळी कामं करायची? आणि तो तुझा लाडका मुलगा आरामात मोबाइल बघत बसणार. नाही तर मुलांबरोबर हुंदडायला जाणार. असा हा मुलगा-मुलगी भेदभाव मी सहन करणार नाही.' असं ठणकावून रिया आपल्या खोलीत जाऊन बसली. समोर पुस्तक घेतलं, पण मन मात्र थाऱ्यावर नव्हतं. सध्या तब्येतीमुळे आईला पटापट कामं करणे जमत नव्हतं. म्हणून गेले काही दिवस रियाच आईला मदत करत होती. दोन तास घरकामात मदत करून प्रिया अभ्यासाला बसायची. आईची काळजीदेखील घ्यायची. कालचीच गोष्ट... जेवणाची वेळ होती. आईचं सगळं लक्ष मुलगा चिन्मयकडेच! त्याला काय वाढू आणि किती वाढू असं तिला झालं होतं. पण रियाने भाजी मागितली, तर 'हात मोडलेत का तुझे?' असं उत्तर तिला मिळालं आणि असं नेहमीच घडायचं. त्यामुळे रियाच्या मनात चिन्मयबद्दल एक अढीच बसली होती. पण आपल्या घरात मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जातो याची जराही जाणीव चिन्मयला नव्हती. रियाची आई मागच्या पिढीची, मोठ्या संस्कारी घरात वाढलेली. त्यामुळे मुलींना घरातली कामे आलीच पाहिजेत या विचारांवर ती ठाम होती. त्यात तिला काहीच गैर वाटत नव्हतं. लहानपणापासून लाडात वाढलेल्या चिन्मयला आता आरामाची सवय लागली होती. शाळेतून घरी आलं की, पाठीवरच्या वह्या-पुस्तकांची बॅग पलंगावरती फेकून द्यायची. अन् शाळेचे कपडे न बदलताच लोळत पडायचं. पडल्यापडल्या मोबाइल बघत बसायचं. मग टीव्ही नाही तर मित्रांसोबत खेळायला जायचं. मग थेट जेवणाच्या वेळीच घरी परतायचं. इकडे रिया आईला मदत करून आपला अभ्यास पूर्ण करायची. पण आपल्या बहिणीवर अन्याय होतो याची त्याला जराही कल्पना नव्हती. एके दिवशी रियाची दोन दिवसांची सहल जाणार होती. त्यासाठी रिया तयारी करून निघाली. आता दोन दिवसांच्या कामाचा ताण आईवर येणार होता. रिया सहलीला गेली पण इकडे आईची तब्येत अचानक बिघडली. रियाचे बाबादेखील कामानिमित्त बाहेर होते. आई आजारी पडली ही गोष्ट रियाला फोनवरून कळाली, पण सहल सोडून रिया एकटी परत येऊ शकत नव्हती. दोन दिवसांनंतर रिया घरी आली. तेव्हा तिने पाहिले आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण त्यावेळी चिन्मय आईला चक्क जेवण भरवत होता. रिया धावतच आई जवळ गेली. आईच्या अंगात अजूनही बारीक ताप होता. पण तशी ती बरी होती. थोडासा अशक्तपणा होता. मग आईने चिन्मयबद्दलची सारी इत्थंभूत माहिती रियाला सांगितली. मी सांगितलेली सगळी कामे त्याने केली. अगदी डाळ-भातसुद्धा! सकाळ, संध्याकाळ घराची साफसफाईची सर्व कामे कशी व्यवस्थित केली. आई सांगत असताना चिन्मयची नजर मात्र जमिनीवर खिळली होती. पण चिन्मय एवढे सगळे करू शकतो हे रियाला पटतच नव्हतं. तिचे डोळे भरून आले. म्हणाली, 'चिनू माफ कर. मला वाटलं तू खूपच बेजबाबदार आणि खुशालचेंडू मुलगा आहेस. पण ज्या पद्धतीने तू आईची काळजी घेतली आहेस ते बघून तुला सलाम करावासा वाटतो.' मग आई, चिन्मय आणि रिया तिघेही डोळे पुसत पुसत एकमेकांकडे बघत हसू लागले.

# क्षण कसोटीचे

मानवी जीवन म्हणजे सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा, संधी-अडचणी आणि चढ-उतारांनी भरलेला प्रवास. आयुष्याच्या वाटेवर अनेक सुंदर क्षण येतात; काही क्षण आनंद देतात, आत्मविश्वास वाढवतात आणि जगण्याची प्रेरणा देतात; परंतु काही क्षण असेही येतात, जे आपली खरी परीक्षा घेतात. परिस्थिती आपल्या मनासारखी नसते, निर्णय घेणे कठीण होते, आपली माणसे दूर जातात, अपेक्षा अपूर्ण राहतात किंवा अचानक एखादे संकट समोर उभे ठाकते. हेच ते कसोटीचे क्षण असतात. खरे तर माणसाची ओळख त्याच्या सुखाच्या काळात कमी आणि संकटाच्या काळात अधिक होते. सुखात प्रत्येकजण हसतो; परंतु संकटातही संयम राखून उभे राहणे, परिस्थितीचा स्वीकार करणे आणि पुढे जाण्याचा मार्ग शोधणे हीच खरी जीवनकला आहे. आपल्या मनात अनेकदा प्रश्न निर्माण होतो - माझ्याच वाट्याला हे का आले? परंतु जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणीमागे एखादा धडा दडलेला असतो. संकटे आपल्याला तोडण्यासाठीच येतात असे नाही; अनेकदा ती आपल्याला अधिक सक्षम, शहाणे आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी येतात. ज्या व्यक्तीने कधीच अडचणी पाहिल्या नाहीत, तिला स्वतःच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव नसते; परंतु अडचणींच्या काळात माणसाला स्वतःतील अनेक गुणांचा शोध लागतो - धैर्य, संयम, निर्णयक्षमता, सहनशीलता, चिकाटी आणि परिस्थितीशी जुळवूनघेण्याची क्षमता. म्हणूनच संकटाकडे केवळ संकट म्हणून न पाहता, स्वतःला घडविण्याची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. कठीण प्रसंगात पहिली गरज-संयम कसोटीच्या क्षणी सर्वांत



आधी ढासळते ती मनाची शांतता. घाईघाईने घेतलेले निर्णय अनेकदा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची करतात. म्हणून संकट आले की प्रथम स्वतःला शांत करणे आवश्यक आहे. आता काय होईल? या विचारात अडकण्यापेक्षा आता मी काय करू शकते? हा प्रश्न स्वतः ला विचारला पाहिजे. परिस्थिती आपल्या हातात नसेल, पण आपली प्रतिक्रिया आपल्या हातात असते. संकटावर आपले नियंत्रण नसले तरी संकटाला आपण कसे सामोरे जाणार, हे ठरवण्याचा अधिकार आपल्याकडे असतो. अपयश हा शेवट नसतो. अपयश म्हणजे आपल्याला कुठे सुधारणा करायची आहे, हे दाखवणारा अनुभव. जगातील अनेक यशस्वी व्यक्तींना त्यांच्या वाट्याला अपयश आले आहे. फरक एवढाच की त्यांनी अपयशाला आपली ओळख बनू दिली नाही. पडणे हा पराभव नाही; पडल्यावर पुन्हा उभे राहण्यास नकार देणे हा खरा पराभव आहे. कधी कधी एखाद्या व्यक्तीला मोठ्या मदतीपेक्षा फक्त एवढेच ऐकायचे असते- मी तुझ्यासोबत आहे. ही छोटीशी भावना एखाद्याला मोठ्या संकटातून बाहेर पडण्याचे बळ देऊ शकते. आपल्या आयुष्यात काही गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर असतात. भूतकाळ बदलता येत नाही, काही घटना टाळता येत नाहीत आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या अपेक्षेप्रमाणे वागेलच असेही नाही. अशा वेळी परिस्थितीचा स्वीकार करणे आवश्यक असते. संकटात सकारात्मक विचारांची ताकद समस्या आहे हे मान्य करूनही तिच्यावर उपाय शोधण्याची मानसिकता म्हणजे सकारात्मकता. सगळे संपले असे म्हणण्याऐवजी कठीण आहे, पण मी प्रयत्न करेन असे म्हणणे म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन. अंधार कितीही मोठा असला तरी एक छोटासा दिवा त्याला आव्हान देऊ शकतो. त्याचप्रमाणे कठीण परिस्थितीत एक आशावादी विचार माणसाला पुढे जाण्याचे बळ देऊ शकतो. इतरांच्या अनुभवांतून शिकणे - आपल्या आयुष्यातील प्रत्येक समस्या स्वतः अनुभवूनच शिकण्याची गरज नाही. आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींचे अनुभव, चुका आणि संघर्ष यांतूनही आपण शिकू शकतो. कसोटीच्या क्षणी स्वतःला जपणे-शांतपणे बसणे, प्रार्थना किंवा ध्यान करणे, एखाद्या विश्वासू व्यक्तीशी बोलणे, निसर्गाच्या सान्निध्यात राहणे, पुरेशी झोप घेणे आणि आपल्या आवडीच्या गोष्टी करणे, या साध्या गोष्टी मनाला आधार देतात. स्वतःला सावरणे हा स्वार्थ नसतो; पुढे लढण्यासाठी स्वतः ला सक्षम ठेवणे असते. शिक्षक आणि पालकांसाठी कसोटीचे क्षण - शिक्षक आणि पालकांच्या जीवनातही अनेक कसोटीचे क्षण येतात. मुलांच्या शिक्षणातील अडचणी, बदलते तंत्रज्ञान, बदलती सामाजिक परिस्थिती, विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजा आणि वाढत्या अपेक्षा यांचा सामना करताना संयम आणि समजूतदारपणा आवश्यक असतो. विशेषतः शिक्षकांसाठी प्रत्येक विद्यार्थी हा वेगळा असतो. एखादा विद्यार्थी अभ्यासात मागे असेल, एखाद्याचे वर्तन आव्हानात्मक असेल किंवा एखाद्याच्या कौटुंबिक परिस्थितीचा त्याच्या शिक्षणावर परिणाम होत असेल, तर त्याला केवळ दोष देण्यापेक्षा त्यामागील कारण समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षकाचा एक प्रेमळ शब्द, एक प्रोत्साहनाची थाप किंवा तू हे करू शकतोस हा विश्वास विद्यार्थ्याचे आयुष्य बदलू शकतो. नेतृत्वाची खरी परीक्षा - ज्यांच्यावर इतरांची जबाबदारी असते, त्यांच्यासाठी कसोटीचे क्षण अधिक महत्त्वाचे असतात. कारण त्यांच्या एका निर्णयाचा परिणाम अनेकांवर होऊ शकतो. नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार गाजवणे नव्हे. संकटाच्या काळात पुढे उभे राहणे, जबाबदारी स्वीकारणे, योग्य निर्णय घेणे, सहकाऱ्यांना विश्वास देणे आणि चुका झाल्यास त्यातून शिकणे म्हणजे खरे नेतृत्व. कठीण काळात जो नेता घाबरून मागे हटत नाही, तर आपल्या सहकाऱ्यांना धीर देतो, तोच खरा नेता ठरतो. इतरांशी तुलना करण्याऐवजी कालच्या स्वतः पेक्षा आज आपण किती पुढे आलो आहोत, हे पाहणे अधिक महत्त्वाचे. कसोटीचे क्षण आपल्याला काय शिकवतात? संयम - प्रत्येक गोष्ट लगेच आपल्या मनाप्रमाणे होत नाही. स्वावलंबन - प्रत्येक वेळी कोणीतरी मदतीला येईलच असे नाही. निर्णयक्षमता - अडचणी आपल्याला विचारपूर्वक निर्णय घ्यायला शिकवतात. कृतज्ञता - जे आपल्या जवळ आहे त्याची किंमत समजते. चिकाटी - कितीही अडचणी आल्या तरी पुन्हा प्रयत्न करण्याची शक्ती मिळते. प्रत्येक काळ कायमचा नसतो आयुष्यातील सर्वात मोठे सत्य म्हणजे कोणतीही परिस्थिती कायमची नसते. क्षण कसोटीचे हे जीवनातील केवळ दुःखाचे क्षण नाहीत; ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची घडण करणारे क्षण आहेत. आयुष्यात जेव्हा एखादा कठीण क्षण समोर येईल, तेव्हा घाबरू नका. स्वतःला एकच प्रश्न विचारा - ही परिस्थिती मला तोडण्यासाठी आली आहे की मला अधिक सक्षम बनवण्यासाठी? उत्तर कदाचित लगेच मिळणार नाही. पण संयम ठेवा, विचार करा, योग्य निर्णय घ्या आणि पुढे चालत राहा. कारण काळ कठीण असू शकतो; पण माणूस त्याहूनही अधिक मजबूत असू शकतो. ज्या क्षणी आपण स्वतःला हरलेले समजतो, त्याच क्षणी आपल्यातील खरा विजेता जन्म घेत असतो.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# CJP आणि काँग्रेस यांचे कनेक्शन काय ? पुण्यातील जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सर्वात मोठा खुलासा

मुंबई/वृत्तसेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पुण्यामध्ये भाजपच्या राज्य कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी राहुल गांधी तसेच काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. महिला बिलाला काँग्रेसने विरोध केला. महिला बिलाचे हत्यारे राहुल गांधी आहेत अशी जहरी टीका फडणवीस यांनी केली. राहुल गांधींची छात्रों की गूंज नव्हे तर झूठ की गूंज. संविधानाची मोडतोड करणा-या काँग्रेसच्या हातात माओवाद्यांचं लाल पुस्तक असल्याचे म्हणत फडणवीस यांनी हल्लाबोल केला. सीजेपी म्हणजे काँग्रेस जीताओ प्रोग्राम. पुण्यातील सभेतून देवेंद्र फडणवीसांची काँग्रेससह सीजेपीवर सडकून टीका केली.

रविंद्र चव्हाण अध्यक्ष झाल्यानंतर ही पहिली कार्यकारिणी बैठक झाली. ते अध्यक्ष झाल्यानंतर प्रत्येक निवडणुकीत आपण पहिल्या क्रमांकवर आलो, तीन तृतीयांश जागांवर आपण निवडून आलो. आजचा दिवस अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. पुणेकरांनी डीजेच्या वादात न पडता महाराष्ट्राला दाखवून द्या की सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा केला जाऊ शकतो असे आवाहान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

शिवरायांच्या मावळ्यांच्या प्रमाणे आता चढाई करायची वेळ आली आहे. हे आपल्यासाठी नवीन नाही पण कार्यपद्धती समजून घेण्याची गरज आहे. काँग्रेसकडून होणाऱ्या हल्ल्यांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे भाष्य केले. शत्रूने हल्ले केले तेव्हा शिवरायांनी विविध नाविन्यपूर्ण मार्गांनी शत्रूचा नायनाट केला. संविधानाचा जे दुरुपयोग करतील त्यांचे हात जळल्याशिवाय राहणार नाहीत. काँग्रेसच्या लाल संविधानाच्या आत माओवाद आहे अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली.

राहुल गांधींचा कार्यक्रम म्हणजे छात्रो की गुंज नाही तर ही झूठ की गुंज. आजच्या पिढीला मी युवाशक्ती मानतो राहुल गांधींनी कर्नाटकात भाषण केलं त्यानंतर एका मुलीने फॅक्ट चेक केलं तर ते दावे खोटे निघाले. फॅक्ट चेक करणाऱ्या मुलीच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. महिलांना संधी देण्याची वेळ होती तेव्हा प्रियांका गांधींना




संधी का दिली नाही ? हिमाचल आणि कर्नाटकच्या मंत्रिमंडळात एकही महिला घेत नाहीत आणि इथे येऊन महिलांबाबत विधान करतात. महिला आरक्षणाचा कायदा मोदींजीनी केला. २०२३ साली महिला बिल आले, तेव्हा महिलांना ३३ टक्के आरक्षण आणि ते देण्यासाठी एकतर जनगणना करायची आणि दुसरं आकडेवारी घेऊन जागा वाढवयाच्या हे दोन मुद्दे होते. माझा सुप्रिया, प्रियांका, सकाळच्या भोंग्याला सवाल आहे की त्यावेळी त्या कायद्याला मतदान केलं. कारण तुम्हाला माहीत होतं की तेव्हा एनडीएकडे बहुमत होतं म्हणून यांनी वाहत्या गंगेत हात धुवून घेतले.

एनडीए जवळ बहुमत नाही हे लक्षात आल्यावर विरोधकांनी ये बिल पाडलं. बिल पास झाला नाही तर २०२९ मध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देता येणार नाही. आकाश पाताळ एक करून मोदीजी हे बिल पास करून दाखवतील, माझा माझ्या नेत्यावर विश्वास आहे.जोपर्यंत संसदेत महिलांना स्थान देत नाहीत तोवर मोदीजींचा कारवा (प्रवास) सुरूच राहील. महिलांचा खरा कैवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. N-C मानांकनत महाराष्ट्र पहिला आला आहे. पण राहूल गांधी कर्नाटक, हिमाचल, झारखंडला जात नाहीत, ते येउन महाराष्ट्रात बोलतात. सर्वाधिक परदेशी विद्यापीठे महाराष्ट्रात आले आहेत. अटलजी म्हणाले होते निंदकाचे घर असावे शेजारी, या वाक्यावर माझा विश्वास आहे. देशातील ३९ टक्के परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. जेव्हा त राज्यांसोबत तुलना होईक तेव्हा या लोकांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही. १ लाख २० हजार तरुण तरुणींना आपण नोकरी दिली. काही परीक्षांमध्ये गडबडी झाली हे मान्य आहे. पारदर्शी परीक्षा व्हाव्यात यासाठी आम्ही प्रयत्न करतोय असं मुख्यमंत्री म्हणाले.

## अमेरिकेत केरळच्या महिलांची हत्या

कॅलिफोर्निया : अमेरिकेमधील कॅलिफोर्नियामध्ये भारतातील केरळच्या दोन महिलांची हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून या हत्याप्रकरणात दोन्ही महिलांच्याच एका जवळच्या मैत्रिणीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दोन्ही मृत महिला व पोलिसांनी ताब्यात घेतलेली संशयित महिला या तिघी एकमेकींच्या मैत्रिणी होत्या. कॅलिफोर्नियात एकाच अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या एका मैत्रिणीनेच दुसऱ्या दोन मैत्रिणींची हत्या केल्याचा संशय आहे. या संदर्भात पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मात्र, या दोन महिलांची हत्या नेमक्या कोणत्या कारणांमुळे करण्यात आली, याचा शोध पोलीस घेत आहेत. मृतांची ओळख त्रिशूरमधील मुदिक्कोड येथील अंजना हरी आणि तिरुवनंतपुरममधील केशवदासपुरम येथील न मॅथ्यू अशी पटली आहे, तर हत्या केल्याचा संशय असलेली ही महिला केरळच्या कोट्टायमची रहिवासी असून तिची ओळख अनिला म्हणून पटली आहे. ती या दोन्ही महिलांची मैत्रीण होती, अशी माहिती पीडितांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. केंद्रीय मंत्री



सुरेश गोपी यांनी सोमवारी या घटनेची पुष्टी केली. मंत्री गोपी यांनी सांगितले की, सोमवारी सकाळी सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधला असून त्या दोन महिलांचे मृतदेह केरळला परत आणण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, न मॅथ्यूची अपार्टमेंटमध्येच भोसकून हत्या करण्यात आली, तर अंजनाला कारने धडक देण्यात आली. या हत्येमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. कुटुंबीयांचा हा आरोप असला तरी अमेरिकन पोलिसांनी या आरोपांबाबत अद्याप सविस्तर माहिती दिलेली नाही.

## सरकारी कर्मचाऱ्यांना हिंदी भाषा शिकण्याची सक्ती करणारा निर्णय रद्द

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयामार्फत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात येणारी 'हिंदी भाषा परीक्षा' कायमची रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी (तत्कालीन मुंबई सरकार काळात) शासकीय प्रयोजनांसाठी हिंदी भाषेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर सर्व शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्यात आला. सध्याच्या शासकीय कामकाजाचे स्वरूप आणि 'महाराष्ट्र राजभाषा अधिनियम' यातील तरतुदी विचारात घेता, ही परीक्षा चालू ठेवणे संयुक्तिक ठरत नाही. राज्य सरकारच्या रोजच्या प्रशासकीय कामकाजात हिंदीच्या तुलनेत इंग्रजीचा वापर जास्त केंद्र सरकार तसेच इतर राज्यांशी होणारा पत्रव्यवहार प्रामुख्याने इंग्रजी भाषेतून केला जातो. या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणेत मराठी भाषेला प्राधान्य मिळावे आणि इतर परीक्षांचा ताण कर्मचाऱ्यांवर राहू नये, यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना हिंदी भाषा शिकण्याची सक्ती करणारा निर्णय रद्द करण्यात येत असल्याचा शासन ादेश काढण्यात आला आहे. हा शासन आदेश सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी मराठी भाषा विभागाच्या कार्यासन अधिकारी वैशाली वाघमारे यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी ७ मे २०२६ पासून म्हणजेच पूर्वलक्ष्यी प्रभावाने केली जाणार आहे.

पान १ व ४ वरून

### पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांचा

भटके विमुक्त समाजाचा इतिहास, संस्कृती, सामाजिक परिस्थिती तसेच शासनाच्या विविध योजनांबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व्ही. के. चव्हाण यांनी केले.

बंजारा समाजाची सांस्कृतिक ओळख असलेल्या पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, अधिकारी-कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अशोकराव कदम यांच

परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अशोकराव कदम यांना सेवापूर्ती व साठाव्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. अशोकराव कदम यांचे पुत्र तथा सहकारी मित्र रमेश कदम यांच्या परिवारासाठीही हा सोहळा आनंदाचा आणि संस्मरणीय ठरला.

### एबीसीडी' आरक्षण निर्णयाची

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही राज्य सरकारकडून अंमलबजावणीसाठी विलंब होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने आता कोणताही विलंब न करता निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.
'अन्यथा मुंबई बंद करू' – सर्जेराव जाधव राज्य सरकारने आरक्षणासंदर्भातील निर्णयाची तातडीने अंमलबजावणी केली नाही, तर आगामी काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. गरज पडल्यास मुंबई बंद करण्यासाठीही मातंग समाज रस्त्यावर उतरेल, असा इशारा सर्जेराव जाधव यांनी यावेळी दिला. मोर्चामध्ये मातंग समाजातील पुरुषांसह महिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती. मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोर्चाच्या मार्गावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### परतूर शहरात

सापळा रचला. यावेळी एका हिरो पॅशन (एमएच २१ सीई ७२६६) क्रमांकाच्या दुचाकीवरून जाणाऱ्या एका इसमास थांबवून पंचांसमक्ष त्याची अंगझडती व वाहनाची तपासणी केली असता, त्याच्याकडे वायरच्या पिशव्यांमध्ये विविध कंपन्यांचा मानवी आरोग्यास अपायकारक असलेला प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखू मिळून आला.
जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये राजनिवास सुगंधी पानमसाला व जर्दा (किंमत १४,००० रुपये), विमल पानमसाला व तंबाखू (किंमत ४,००० रुपये), गोवा गुटखा (किंमत ६,००० रुपये) आणि ५०,००० रुपये किमतीची हिरो पॅशन मोटारसायकल असा एकूण ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. सदर गुटखा मानवी जीवितास अपायकारक असल्याचे माहीत असूनही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरटी वाहतूक व विक्री करणाऱ्या काजी रफियोद्दीन खुर्शिद काजी (वय ३५, रा. काजी गल्ली, परतूर) याच्याविरुद्ध पोलीस अमलदार गोविंद पवार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेचे कलम २२३, २७५ अन्वये परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जनार्धन पालवे हे करत आहेत.

### डॉक्टरकडून आयुष्य संपवण्याचा

आणि चौकशी समितीचा अहवाल अद्याप मिळाला नसल्याचा दावा केला होता. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, डॉक्टरांनी केलेल्या आरोपांची सत्यता आणि प्रशासनाने आधीच्या इशाऱ्यांवर काय पावले उचलली, हे आता तपासाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. मात्र, आत्महत्येचे कारण म्हणून कोणत्याही व्यक्तीला थेट जबाबदार ठरवण्यापूर्वी अधिकृत तपास आणि पुराव्यांची प्रतीक्षा करणे आवश्यक आहे.

पान १ व ४ वरून

### 'समृद्धी'वरील १८

केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज दरम्यान टप्प्याटप्प्याने वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. वाहतूक काही काळासाठी बंद ठेवण्याची परवानगी महामार्ग पोलिसांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अर्थात एमएसआरडीसीला दिली आहे.

पान १ व ४ वरून

### माणगांव येथे अखिल बुरुड

मा.श्री.प्रकाश माने, खजिनदार मा.श्री. राजेंद्र नागे, जिल्हा प्रमुख मा.श्री. संदिभाई नागे, तालुका प्रमुख मा.श्री. संदेश महाले यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रम भव्य दिव्य व यशस्वी करण्यात संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष, शैक्षणिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक प्रमुख डॉ.अजय आत्माराम मोरे, महिला आघाडी सौ. अंकीता अजय मोरे आणि सहकारी टिम यांनी प्रचंड व विशेष मेहनत घेतली.

### प्रेषित मुहम्मद यांचे

सेवेत नातिया कलाम प्रतिभावान विद्यार्थी अब्दुल्ला सिद्दीकी आणि जाकीर खान सर यांनी सादर केले. मस्जिद महबूबिया मकतब मध्ये शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थिनींनी ही नातिया कलाम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाची उद्दिष्ट, तसेच उपस्थित उलेमांचा परिचय ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी यांनी करून दिला. यावेळी मौलाना अकील कुरेशी, मौलाना कारी शम्सुद्दीन, मौलाना मुफ्ती सुहेल कासमी मेवाती, मौलाना मुफ्ती मुरसलीन कासमी मेवाती, तसेच मदरसा रौजतुल उलूम व मौलाना मुहम्मद अली जौहर प्राथमिक शाळेचे संस्थापक-सचिव अय्यूब खान यांनी सीरत-ए-नबीच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय समारोपाच्या मार्गदर्शन करताना मौलाना मुफ्ती अब्दुल कदीर कासमी यांनी मुस्लिम समाजाला आवाहन केले की, प्रेशीत मुहम्मद स यांच्या पवित्र जीवनाचा आदर्श स्वीकारून जीवन जगावे आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या सुन्नतींचे पालन करावे. सीरत-ए-नबी केवळ रबीउल अव्वल किंवा ईद-ए-मिलादुन्नबी पुरती मर्यादित नसून सीरतचा व्यापक अर्थ असून तो प्रत्येक मुस्लिमाच्या संपूर्ण जीवनाशी जोडलेला आहे. सीरत-ए-नबीचा संदेश देशातील सर्व समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार हाफिज अल्ताफ अहमद, इमाम मस्जिद महबूबिया यांनी मानले. दूरवरून प्रवासातील अडचणी सहन करून परतूर येथे उपस्थित राहिलेल्या सर्व उलेमांचे त्यांनी विशेष आभार मानले. अशा ज्येष्ठ उलेमांची उपस्थिती ही परतूर शहरासाठी अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मस्जिद व्यवस्थापन समितीचे अल्हाज सय्यद जहूर अली, अल्हाज सय्यद कमर अली, सय्यद मुक्तदिर अली, सय्यद जुनैद अली, सय्यद इरफान अली, सय्यद फजल अली, सय्यद अझहर अली, अल्हाज सय्यद हामिद अली तसेच नवयूवक तरूण,आणि मस्जिद मध्ये नमाज अदा करणाऱ्या भाविकांनी विशेष परिश्रम घेत उत्कृष्ट व्यवस्था केली. शेवटी मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी, प्रदेशाध्यक्ष मजलिस-ए-अहरार इस्लाम, महाराष्ट्र यांच्या दुआने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सुनेत्रा पवारांच्या अध्यक्षतेत सप्टेंबरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यव्यापी शिबीर

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे एक दिवसीय राज्यव्यापी शिबिर २७ सप्टेंबर रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी कोअर कमिटीच्या बैठकीनंतर दिली. याआधी सोमवारी ३१ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत देवगिरी बंगल्यावर झाली. या बैठकीत शिबिराचे आयोजन करण्याचा निर्णय झाला. शिबिरात ७५० प्रमुख नेते, निमंत्रित कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांना बोलावण्यात येईल. यामध्ये सर्व जिल्हाध्यक्ष, महानगर प्रदेश यातील प्रमुखांना निमंत्रित करण्यात येईल. शिबिराचा अजेंडा ठरवण्यासाठी लवकरच पक्षाच्या प्रमुख नेत्यांची एक बैठक होणार असल्याचे तटकरे म्हणाले. जेन झी सोबत थेट संवाद साधण्यासाठी शिबिराच्या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहे. अजित पवार तरुणाईत लोकप्रिय होते. आता नव्याने जेन झी सोबत संवाद साधला जाईल. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी आमदार दिलीप वळसे पाटील यांना मुख्य समन्वयक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. दिलीप वळसे पाटील हे राज्यातील २२ जिल्हयात होणाऱ्या निवडणुकीत समन्वयकाचे काम करतील. यामध्ये दौरे करावेत आणि काही सहकाऱ्यांनासोबत घेऊन मर्यादित कालावधीत पक्ष मजबूतीसाठी एक आराखडा तयार करावा अशा सूचनाही सुनिल तटकरे यांनी दिल्या. बीएलओ आणि एसआयआर संदर्भात पक्षाने ज्येष्ठ नेते व माजी मंत्री नवाब मलिक यांची प्रमुख समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या समवेत



अनिल भाईदास पाटील यांची सहसमन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. याबाबतची माहिती संकलित करून पुढच्या आठवड्यात बैठक घेऊन अंमलबजावणी किंवा त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर केल्या जातील असे सुनिल तटकरे यांनी सांगितले.

## पंतप्रधान मोदी अन् इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांची भेट

नवी दिल्ली : अमेरिका आणि इराणमधील संघर्ष दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दोन्ही देशांमधील तणावाला सहा महिन्यांहून अधिक काळ लोटला असला, तरी युद्धाबाबत अद्यापही कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. यामुळे पश्चिम आशियात युद्धाचे काळे ढग कायम असून, विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या जागतिक व्यापाराला मोठे अडथळे निर्माण होत आहेत. या जागतिक घडामोडींचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. पश्चिम आशियातील या तणावपूर्ण वातावरणात आणि अमेरिका-इराण संघर्ष सुरू झाल्यानंतर पहिल्यांदाच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांची 'एससीओ' शिखर परिषदेदरम्यान प्रत्यक्ष भेट झाली आहे. या उच्चस्तरीय भेटीमुळे संपूर्ण जगाचे लक्ष याकडे लागले होते. किर्गिस्तानची राजधानी बिश्केक येथे पार पडलेल्या या परिषदेदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाची द्विपक्षीय चर्चा झाली. या बैठकीत पश्चिम आशियातील बिघडलेली परिस्थिती, होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यापारातील



अडथळे आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याची दाट शक्यता आहे. यापूर्वी हे दोन्ही नेते २०२४ च्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान रशियातील कझान येथे भेटले होते, तसेच मार्च महिन्यात अमेरिका-इराण संघर्षाच्या काळात पंतप्रधान मोदींनी दूरध्वनीवरून पेझेश्कियान यांच्याशी संवाद साधला होता. इराणच्या अध्यक्षांसोबतच्या बैठकीनंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावरून आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांची बिश्केक येथे भेट घेतली. विविध क्षेत्रांमध्ये इराणबरोबरची भारताची दीर्घकालीन मैत्री अधिक दृढ करण्याच्या आमच्या कटिबद्धतेचा मी पुनरुच्चार केला आहे. आगामी काळात आम्हाला आमच्या द्विपक्षीय व्यापाराची व्याप्ती वाढवायची आहे आणि त्यात विविधता आणायची आहे. या बैठकीत आम्ही या क्षेत्रातील सध्याच्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा केली. तसेच, या भागात शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने केल्या जाणाऱ्या सर्व प्रयत्नांना भारत आपला पाठिंबा सतत देत राहील. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदींनी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला होता. त्या संभाषणादरम्यान पेझेश्कियान यांनी पश्चिम आशियातील बदलती परिस्थिती आणि पुढील वाटचालीबाबत मोदींना सविस्तर माहिती दिली होती. यावर प्रतिक्रिया देताना, सर्व वाद आणि मतभेद केवळ परस्पर संवाद आणि राजनैतिक (डिप्लोमॅटिक) चर्चे च्या माध्यमातूनच सुटले पाहिजेत, या भारताच्या भूमिकेचा पंतप्रधान मोदींनी ठळकपणे पुनरुच्चार केला होता. पश्चिम आशियाई क्षेत्रात दीर्घकालीन शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले होते. तसेच, आंतरराष्ट्रीय सागरी क्षेत्रातील दळणवळणाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे आणि जागतिक व्यापाराची सुरक्षितता सुनिश्चित करणे या मुद्द्यांवरही पंतप्रधान मोदींनी विशेष भर दिला होता. या ताज्या भेटीमुळे भारत आणि इराणमधील संबंधांना आगामी काळात नवे आयाम मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तिसऱ्या श्रावण सोमवारी पंचमुखी महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



जालना/प्रतिनिधी : श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी शहरातील पंचमुखी महादेव मंदिरात भगवान महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तांची वर्दळ सुरू झाली होती. 'हर हर महादेव', ' नमः शिवाय'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. श्रावणातील प्रत्येक सोमवार हा भगवान शिवभक्तांसाठी विशेष महत्वाचा मानला जातो. त्यामुळे तिसऱ्या श्रावण सोमवारी पंचमुखी महादेवाच्या दर्शनासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण-तरुणींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. अनेक भाविकांनी पहाटे मंदिरात जाऊन महादेवाचे दर्शन घेतले. काही भक्तांनी उपवास करून विशेष पूजा, अभिषेक, बेलपत्र, फुले व दुग्धाभिषेक अर्पण केला. मंदिरात सकाळपासून विविध धार्मिक विधी व पूजाअर्चा करण्यात आली. महादेवाच्या पिंडीला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. भक्तांनी मनोभावे पूजा करून सुख-समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर परिसरात दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीमुळे भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेता यावे यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले. परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रावण महिन्यातील उर्वरित सोमवारीही पंचमुखी महादेव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

# परतूर शहरात अवैध गुटखा वाहतूकीवर पोलिसांची कारवाई

## ७४ हजारांच्या प्रतिबंधित गुटख्यासह दुचाकी जप्त



परतूर/प्रतिनिधी : शहरात अवैध धंद्यांवर कारवाईसाठी गस्तीवर असलेल्या पोलिसांच्या पथकाने जय मल्हार चौक परिसरात एका दुचाकीस्वाराला रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून तब्बल ७४ हजार रुपये किमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, तंबाखू आणि एक मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शुक्रवारी (दि. २९) रोजी सकाळी ७:४५ वाजता परतूर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार गोविंद पवार हे त्यांचे सहकारी पोहेकॉ अशोक गाढवे आणि विजय जाधव यांच्यासह हद्दीत पेट्रोलिंग करत होते. यादरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम मोटारसायकलवरून प्रतिबंधित गुटखा घेऊन वखार महामंडळ रोडने जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष जय मल्हार चौक येथे (पान ३ वर)


# जिल्हास्तरीय संस्कृत स्पर्धेत प्रणवी भिसेचा प्रथम क्रमांक



जालना : शहरातील ऐतिहासिक श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा),ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनानिमित्त आयोजित संस्कृत पाठांतर स्पर्धेत ऑक्सफोर्ड स्कूलची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी प्रणवी राजेश भिसे हिने प्रथम क्रमांक पटकावला. व्यासपीठावर महापालिकेच्या महिला व बालविकास सभापती संध्याताई देठे, नगरसेविका रीमाताई खरात, परीक्षक सुरेखा गव्हाणे उपस्थित होते. स्पर्धेत प्राविण्य प्राप्त १७ व इयत्ता ९ वी व १० वी च्या ०९ विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. यावर्षी एकूण ३०४ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला तर एकूण ६२ विद्यार्थ्यांनी पारितोषिके देण्यात आली. सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार जयश्री कुलकर्णी यांनी मानले. याप्रसंगी सुधाकर वाहेगावकर, श्रीकांत शेलगावकर, कल्याणी कुलकर्णी, सुर्यकांत रत्नपारखी,सुमित कुलकर्णी, कीर्ती शेलगावकर, मनोहर कुलकर्णी, संदीप नेरकर, अमोल कुलकर्णी, मीरा बोधे, शैलेन्द्र बदनापुरकर, रेणुका गुलापेल्ली आदी उपस्थित होते.

# डॉक्टरकडून आयुष्य संपवण्याचा प्रयत्न तरी प्रशासन ढीम्म; अखेर घेतला टोकाचा निर्णय!

फलटण उपजिल्हा रुग्णालयाशी संबंधित आणखी एका डॉक्टरच्या मृत्यूने आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र रुपनवर यांनी मुंबईतील सायन परिसरात आत्महत्या केली. बचाव पथकाने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. काही महिन्यांपूर्वी याच रुग्णालयातील डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येची घटना चर्चेत आली होती. उपलब्ध वृत्तांनुसार, २७ ऑगस्ट रोजी सकाळी सायन रेल्वे स्थानक परिसरातील उड्डाणपुलाच्या टॉवरवर डॉ. रुपनवर चढल्याची माहिती पोलिसांना मिळाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी डॉक्टरांशी संवाद साधून त्यांना खाली आणण्याचा प्रयत्न केला. बचावादरम्यान त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात आल्याने प्राथमिक उपचार करण्यात आले आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. धक्कादायक म्हणजे ते आत्महत्या करु शकतात, याची माहिती प्रशासनाला होती. तरीही प्रशासन ढीम्म राहिल्याने प्रशासनाविरोधात आक्रोश पाहायला मिळतोय. डॉ. रुपनवर यांनी यापूर्वी काही गंभीर आरोप केले होते. शस्त्र परवान्यासाठी आवश्यक असलेले वैद्यकीय 'फिटनेस सर्टिफिकेट' देण्यासाठी आपल्यावर दबाव



टाकण्यात आला आणि नकार दिल्यानंतर धमकी व धक्काबुक्की झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. या प्रकरणात संबंधित व्यक्तीविरोधात फलटण पोलिसांत तक्रार आणि गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त आहे. डॉ. रुपनवर यांनी प्रसाद प्रदीप कोंडे-देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. ते माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे पीए असल्याचा दावा करत असल्याचे वृत्त आहे. फिटनेस प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरून आपल्यावर दबाव आणण्यात आला आणि धमकी देण्यात आल्याचा आरोप रुपनवर यांनी केला होता. डॉ. रुपनवर यांनी फलटण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीला मदने यांच्यावर कामात हस्तक्षेप आणि काही प्रकरणे दडपण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप केल्याचे वृत्त आहे. पुणे विभागातील वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. या आरोपांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बाजू अधिकृतपणे समोर येणेही महत्त्वाचे आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे डॉ. रुपनवर यांनी यापूर्वीही टोकाचे पाऊल उचलण्याचा इशारा दिल्याचे समोर आले आहे. त्यांच्या हातावर कथित सुसाईड नोट लिहिल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर त्यांनी सोशल मीडिया पोस्ट आणि व्हिडिओच्या माध्यमातूनही आपली व्यथा मांडल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी त्यांचे समुपदेशन केले होते; मात्र त्यानंतरही वाद कायम राहिल्याचे सांगितले जाते. या घटनेनंतर डॉक्टरांच्या च-ठऊ संघटनेकडून प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे. डॉ. रुपनवर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी केली होती(पान ३ वर)

# बुलढाण्यात शिक्षक भारतीच्या यवतमाळ उर्दू टीमचे जंगी स्वागत; शिक्षक आमदारकीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरेश देवकर यांचे मार्गदर्शन



बुलढाणा प्रतिनिधी : बुलढाणा येथे शुक्रवारी शिक्षक भारती, यवतमाळच्या उर्दू टीमच्या स्वागताचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. यवतमाळ येथून आलेल्या सर्व शिक्षक बांधवांचे शाल व हार घालून जल्लोषात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षक भारतीचे भावी आमदार सुरेश बाबुराव देवकर सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी बुलढाणा जिल्हा शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष अबूजेद अहमद सर, अमरावती विभागाचे अध्यक्ष शफी सर तसेच बुलढाणा जिल्ह्यातील शिक्षक भारतीची संपूर्ण टीम मोठ्या संख्येने उपस्थित होती. शिक्षक आमदारकीच्या निवडणुकीवर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन कार्यक्रमादरम्यान सुरेश बाबुराव देवकर सर यांनी आगामी शिक्षक आमदारकीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपस्थित शिक्षकांना सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षकांचे प्रश्न, हक्क आणि विविध मागण्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्यासाठी शिक्षकांनी संघटित होणे आणि मजबूत नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात शिक्षक भारतीची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवण्यासाठी सर्व शिक्षकांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. यवतमाळच्या उर्दू शिक्षक टीमच्या स्वागताच्या निमित्ताने झालेल्या या कार्यक्रमातून संघटनात्मक एकजुटीचा आणि आगामी शिक्षक आमदारकीच्या निवडणुकीच्या तयारीचा नवा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित शिक्षकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शिक्षक बांधवांनी आगामी काळात शिक्षकांच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# 'समृद्धी'वरील १८ लाखांच्या दरोड्याचा मास्टर माईंड सापडला

मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर काही दिवसापूर्वी दरोडेखोरांनी एका कुटुंबाला लुटल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर नागरिकांमध्ये एकच भीती पसरली होती. या दरोडेखोरांना लवकरात लवकर अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आरोपींना लवकरात लवकर पकडण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. समृद्धी महामार्गावरील दरोड्याचा मुख्य सूत्रधाला बीडमधून जेरबंद करण्यात आले आहे. सिन्नर तालुक्यातील मलढोण व दुशिंगपूर शिवारात चॅनेल क्रमांक ५३८ ते ५४३




दरम्यान गुरुवारी मध्यरात्री दरोडेखोरांनी धावत्या वाहनांचे टायर पक्चर करत तब्बल १८ लाखांचा दरोडा टाकला. तब्बल दीड तास हा थरार सुरू होता. याच दरोडेखोरांच्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला पोलिसांनी बीडच्या शिरूर तालुक्यातून अटक केली आहे. टोळीचा मुख्य सूत्रधार किरण अजिनाथ गायकवाड असं त्याचे नाव आहे. किरण गायकवाड हा हिवरसिंगा येथील राहणारा असून तांत्रिक आणि गुप्तहेरांच्या माहितीवरून पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. दरोडेखोरांच्या इतर साथीदारांचाही पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरोडेखोरांनी खिळे आणि टोकदार लोखंडी पट्ट्यांचा वापर करत वाहनांचे टायर पंचर केले होते. त्यानंतर प्रवाशांना शस्त्रांचा धाक दाखवून बेदम मारहाण करत सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटून नेली होती.

छत्रपती संभाजीनगरच्या वकिलाला लुटले

छत्रपती संभाजीनगरच्या वकिल असलेल्या मिश्रा कुटुंबीयाला मारहाण करत जवळचे सोने नाणे ऐवज लुटून नेला. या घटनेनंतर मिश्रा कुटुंबीयांनी पोलिसात तक्रार दाखल केली खरी मात्र कुटुंब अजूनही दहशतीत आहे, तब्बल अर्धा तास हा सगळा प्रकार समृद्धीमहामार्ग वर सुरू होता. मिश्रा कुटुंबीयांनी सांगितले की, दरोडेखोर ५ ते ६ जण होते असे वाटले. सुरुवातीला त्यांनी माझ्या बाळाला त्यांनी ओढून घेतले आणि याला घेऊन जातो अशी धमकी दिली. त्यानंतर आमचे पैसे मंगळसूत्र सोनं, सगळं ओढून घेतले, खाण्याचे समान घेतले कपडे घेतले. आम्ही खूप घाबरलो होतो. प्रत्येक सेकंदाला अनेक गाड्या जात होत्या. मात्र कोणीही थांबत नव्हतं. समृद्धी महामार्गावर मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर आयटीएमएस अंतर्गत सीसीटीव्ही बसविण्याकरिता गॅन्ट्री उभारण्याचे काम (पान ३ वर)

# माणगांव येथे अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान,महाराष्ट्र राज्य आयोजित बुरुड समाज मेळावा मोठ्या उत्साहात साजरा

## राज्य स्तरीय तमाम बुरुड समाज बांधवांच्या लक्षणीय उपस्थितीत आणि उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न



विश्वास बळीराम गायकवाड बोरघर माणगांव रायगड : काल रविवार दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी मानस बँक्वेट हॉल, माणगांव येथे प्रथमच भव्य दिव्य असा नेत्रदिपक बुरुड समाज मेळा ढोल - ताशांच्या गजरात रायगडचे पालक मंत्री मा.भरतशेठ गोगावले साहेब यांच्या हस्ते उदघाटन व चंद्रपूरचे आमदार व समाज भुषण मा.श्री.किशोरभाऊ जोरगेवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत माणगांव व महाराष्ट्रातुन आलेल्या बुरुड समाज बांधव यांच्या भरघोस प्रतिसादात मोठ्या उत्साहात संपन्न झाला !... सदर कार्यक्रमात जेष्ठ नागरीक यांचा सन्मान म्हणुन छत्री, १० वी १२ वी तील ९० % पेक्षा जास्त गुण विद्यार्थी यांचा विशेष गौरव, १ ते ५ वी दफ्तर- वही, ६ ते ९ वी, उच्च शिक्षित तरुण यांचा विशेष सत्कार तसेच गरसेवक,उद्योजक,प्रतिष्ठीत व्यक्तींनी केलेल्या विशेष सहकार्या बद्दल त्यांचा समाज भुषण पुरस्कार देवुन विशेष सन्मान करण्यात आले. सदर कार्यक्रमास उद्योजक मा.श्री सदानंद गायकवाड (उरण), उद्योजक व निवृत्त पोलिस सहाय्यक अधिक्षक मा.श्री. प्रदीप माने (पनवेल) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्रातुन आलेल्या नागपुर,चंद्रपूर कोल्हापूर, पुणे,नाशिक,मुंबई,पनवेल, ठाणे,खेड, चिपळूण,दापोली आणि रायगड येथील समाज बांधव यांचा विशेष सन्मान संघटनेचे अध्यक्ष मा.श्री. आबासाहेब पवार, महासचिव (पान ३ वर)

# प्रेषित मुहम्मद यांचे अनुसरण हेच सीरत-ए-रसूलचा महत्त्वाचा पैलू:मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी

## सीरत-ए-नबी स. कार्यक्रमात ज्येष्ठ उलेमांचे मार्गदर्शन

परतूर / एम. एल. कुरेशी : परतूर शहरातील पठाणपुरा येथील मस्जिद महबूबिया येथे ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने १२ रबीउल अव्वल, बुधवार रोजी सीरत-ए-नबी स. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मजलिस-ए-अहरार ए इस्लाम महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी यांनी आपल्या मार्गदर्शनात पैगंबर हजरत मुहम्मद स.यांचे अनुसरण करणे हा सीरतचा अत्यंत महत्वाचा पैलू असल्याचे सांगितले, त्यांच्या पवित्र जीवनाचा आदर्श प्रत्येक मुस्लिमाने आपल्या जीवनात अंगीकारला पाहिजे, असे प्रतिपादन केले.ते म्हणाले की, हजरत मुहम्मद स. त्यांचे संपूर्ण जीवन मानव जातीसाठी आदर्श आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही कोणाचे नुकसान केले नाही, तर मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य केले. आपल्या शत्रूंनाही क्षमा करण्याचे महान उदाहरण त्यांनी जगासमोर ठेवले. त्यांच्या उत्तम आचार-विचारांची साक्ष कुरआन शरीफ देतो, आणि त्यांची सीरत आत्मचरित्र, म्हणजे कुरआन शरीफची प्रत्यक्ष व्याख्या आहे. देशप्रेमाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाने देशात राहणाऱ्या सर्व समाजातील लोकांशी सहानुभूती, बंधुभाव आणि मानवतेच्या भावनेने वागले पाहिजे. देशाची प्रगती, अखंडता आणि शांतता, एकता यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे.यावेळी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मुस्लिम समाज तसेच उलेमांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. मौलाना हबीबुर्रहमान अहरार ए इस्लाम,शाही इमाम मौलाना उस्मान लुधियानवी, शहीद टिपू सुलतान, मौलाना हुसैन अहमद मदनी, मौलाना महमूद उल हसन, मौलाना कासिम नानौतवी, मौलाना अबुल कलाम आझाद, यांच्यासह देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य उलेमांच्या बलिदानाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. देशाची एकता, अखंडता आणि देशात राहणाऱ्या सर्व नागरिकांच्या कल्याणासाठी मुस्लिम समाजाने पुढे येऊन सकारात्मक भूमिका बजवावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच समाजाने विविध प्रकारच्या षड्यंत्रांपासून सावध राहावे आणि आपल्या धार्मिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी जागरूक राहावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जमीयत उलेमा तालुका परतूरचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती अब्दुल कदीर कासमी होते. कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मौलाना कारी शम्सुद्दीन, नाजिम मदरसा अबी-बिन काआब, आष्टी तालुका परतूर; मदरसा रौजतुल उलूमचे सचिव, अय्यूब खान पठाण, मौलाना मुफ्ती सुहेल कासमी मेवाती



आणि मौलाना मुफ्ती मुरसलीन कासमी मेवाती आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मौलाना अकील कासमी कुरेशी, इमाम मस्जिद रेल्वे स्टेशन परतूर; हाफिज मुहम्मद हारून, इमाम मस्जिद हाशमिया परतूर; हाफिज मुजफ्फर मिल्ली, शहराध्यक्ष जमीअत उलेमा परतूर. ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी. महमूद सर; डॉ. तकियुद्दीन सिद्दीकी; जावेद खान पठाण; मोहसीन खान पठाण; पत्रकार मुश्ताक देशमुख; अल्हाज नबी साहेब देशमुख; परवेज देशमुख; गौस देशमुख; शेख सलीम साहेब आणि फारूक आलम कादरी यांची उपस्थिती होती. तसेच परतूर शहरातील अनेक उलेमा व हाफिज-ए-कुरआन यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सुरुवात कुरआन शरीफच्या पठणाने आणि नात-ए-रसूल स. ने झाली. कुरआनाचे पठण मौलाना मुफ्ती मुरसलीन आणि हाफिज हारून यांनी केले. नबी पाक स. यांच्या (पान ३ वर)